# "मागेल त्याला शेततळे" योजना



धनश्री निगडे
आचार्य पदवी विद्यार्थीनी
विस्तार शिक्षण विभाग
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

अपुऱ्या व अनियमित पावसामुळे राज्यात पाणी टंचाई परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उत्पादनावर विपरीत परिणाम झालेला आहे. शेतकऱ्यांना शाश्वत सिंचन आणि पिकांना पाणी पुरेल अशा पद्धतीने पाण्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. यासाठी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याची संरक्षित साठवणूक करून, उपलब्ध पाणी पिकांना, जनावरांना व पिण्यासाठी टंचाईच्या काळात वापरता येते. यासाठी शासनाची मागेल त्याला शेततळे योजना उपयुक्त ठरू शकते. यासाठी जाणून घेऊया योजनेबद्दल...

- "मागेल त्याला शेततळे" योजना कृषी आयुक्तालय मार्फत राबवण्यात येते.
- "मागेल त्याला शेततळे" योजना अनुदान पद्धतीने राबवण्यात येते.
- शेती उत्पादनामध्ये शाश्वतता आणण्यासाठी तसेच दुष्काळावर मात करण्यासाठी शेततळे उपयुक्त असल्याने राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचनाची उपलब्धता वाढविणे तसेच संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी "मागेल त्याला शेततळे" योजना राबवण्यात येते.
- टंचाईग्रस्त भागातील ज्या गावात मागील ५ वर्षात एक वर्ष तरी ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी जाहीर केली आहे, अशा गावांमध्ये प्राधान्याने पहिल्या टप्प्यात ५१,५०० शेततळी घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) व ज्या कुटुंबामध्ये आत्महत्या झाली आहे, त्यांच्या वारसांना निवड प्रक्रियेमध्ये जेष्ठता यादीत सुट देऊन प्रथम प्राधान्याने त्यांची निवड करण्यात येते.
- शेततळ्याची मागणी करणाऱ्या अर्जदाराला प्रथम याप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत सात प्रकारच्या आकारमानाची शेततळी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सर्वात मोठ्या आकारमानाचे शेततळे ३०x३०x३ मी. असून सर्वात कमी १५x१५x३ मी. आकारमानाचे आहे.
- ३०x३०x३ मी. शेततळ्यासाठी रु. ५०,०००/- इतके कमाल अनुदान निश्चित करण्यात आले आहे. इतर शेततळ्यासाठी आकारमानानुसार अनुदान देय होईल. रु. ५०,०००/- पेक्षा जास्त खर्च झाल्यास उर्वरित रक्कम लाभार्थ्याने स्वत: खर्च करावयाची आहे.

- शेतकऱ्यांच्या नावे कमीत कमी ६० गुंठे जमिन असावी.
- शेततळ्याच्या मागणी करिता अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावयाचे आहेत.
- जिल्हा पातळीवर मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आढावा व समन्वय समिती, या योजनेवर देखरेख ठेवतात. योजना अंमलबजावणी, सनियंत्रण व समन्वयासाठी जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती असते. तालुका पातळीवर तालुका समिती शेततळ्याला मान्यता देते.
- शेततळे खोदण्यास परवानगी मिळाल्यानंतर ३० दिवसांच्या आत शेततळ्याचे काम सुरु करणे गरजेचे आहे.
- शेतकऱ्याने स्वत:, मजुरांद्वारे किंवा जेसीबी, पोकलेनच्या मदतीने शेततळे खोदावे.
- शेततळ्याचे काम पूर्ण झाल्यावर, शेतकऱ्याने तालुका कृषी कार्यालयाला कळविल्यानंतर अनुदानाची रक्कम ३० दिवसांच्या आत लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.
- "मागेल त्याला शेततळे" या योजनेसाठी लागणारा निधी हा ठराविक टप्प्यात संबंधित विभागाला देण्यात येतो.

### शेततळ्यासाठी अटी / नियम काय असतील:

- शेततळ्याचा अर्ज करण्यासाठी सात बाराचा उतारा, ८ अ चा उतारा, दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींसाठी रेशन कार्डची झेरॉक्स किंवा उपलब्ध नसल्यास ग्राम सेवकांचा दाखला, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाचा वारसाचा दाखला इ. कागदपत्रे आवश्यक आहेत.
- कृषी विभागाचे कृषी सहाय्यक / कृषी सेवक यांनी निश्चित केलेल्या ठिकाणी शेततळे घेणे बंधनकारक असेल.
- कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून शेततळ्याचे काम तीन महिन्यात पूर्ण करणे बंधकारक राहील.
- लाभार्थ्याने शेततळे पूर्ण झाल्यानंतर लेखी अर्जासह स्वत:चा राष्ट्रीयकृत बँकेच्या पास बुकची झेरॉक्स संबधित कृषी सहाय्यक/ कृषी सेवक यांच्याकडे सादर करावी. मात्र त्यावर खाते क्रमांक, बँकेचा आयएफएससी व एमआरसीआर कोडचा व शाखेचा उल्लेख असणे गरजेचे आहे.
- लाभार्थीसह शेततळ्याचा फोटो जीपीएस प्रणालीद्वारे कृषी खात्याच्या अधिकाऱ्याने अपलोड केल्याशिवाय शेतकऱ्याला अनुदान दिले जात नाही.
- लाभार्थ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर शेततळ्याची नोंद घेणे बंधनकारक आहे.
- यापुर्वी अर्जदाराने शेततळे, सामुहिक शेततळे अथवा भात खाचरा सोबत तयार होणारी बोडी या घटकांचा शासकीय योजनामधून लाभ घेतलेला नसावा.
- शेततळ्याची निगा व दुरुस्तीची जबाबदारी संबधित शेतकऱ्याची राहील.
- पावसाळ्यात तळ्यात गाळ वाहून येणार नाही अथवा साचणार नाही यासाठी व्यवस्था लाभार्थ्याने स्वत: करायची आहे.
- मंजूर आकारमानाचे शेततळे खोदने बंधनकारक आहे.
- इनलेट आउटलेट ची सोय असावी.
- शेततळ्याचा प्लास्टिक अस्तरीकरणाचा खर्च शेतकऱ्याने स्वत: करावा.
- शेततळ्याच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करावी.

(संपर्क: +९१ ९९७५२९५८००)

★★★